# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १३-०७-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक १३ जुलै २०१५ रोजी (का.प.क्र .०४) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी १०-३० वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.प्रकाश महाजन,आयएएस,नगरसचिव,श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री. खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री. जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री. वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ. रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री. सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ. स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स. श्री. खान अय्युब म.हुसेन खान
१६. स.स. श्री. जाधव ज्ञानोबा पांडूरंग
१७. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१८. स.स. श्री. शेजवळ सुभाष सयाजी
१९. स.स. श्री. रावसाहेब राधाकिसन आमले
२०. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
२१. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२२. स.स. श्री. अफसर खॉन यासीन खॉ
२३. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२४. स.स. श्री. सय्यद मतीन रशीद
२५. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२६. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२७. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२८. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी

२९. स.स. श्री. सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
३०. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
३१. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
३२. स.स. सौ. शोभा नारायणराव वळसे
३३. स.स. श्री. चित्ते नितीन रमन
३४. स.स. सौ. ज्योती सुभाष पिंजरकर
३५. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३६. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३७. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३८. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३९. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
४०. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
४१. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४२. स.स. श्री. मकरंद माधवराव कुलकर्णी
४३. स.स. श्री. खान इरशाद इब्राहिम
४४. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४५. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४६. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४७. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४८. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४९. स.स. श्री. तनवाणी राजु लेखराज
५०. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
५१. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
५२. स.स. श्री.किर्ती महेंद्र शिंदे
५३. स.स. श्री. एडके विकास प्रकाश
५४. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५५. स.स. श्री. भादवे रामेश्वर बाबुराव
५६. स.स. श्री. बल्लाळ मनोज आसाराम
५७. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५८. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
५९. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
६०. स.स. श्री. शेख जफर अखतर
६१. स.स. श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
६२. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
६३. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
६४. स.स. श्री. दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६५. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
६६. स.स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
६७. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण

६८. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६९. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७०. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७१. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७२. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७३. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७४. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७५. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७६. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
७७. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
७८. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
७९. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
८०. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
८१. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८२. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८३. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८४. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
८५. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
८६. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
८७. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
८८. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
८९. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
९०. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९१. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९२. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९३. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९४. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
९५. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९६. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
९७. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
९८. स.स. श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे
९९. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
१००. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
१०१. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्री.कांबळे चेतन जनार्धन
४. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.रेणुकादास वैद्य :जागतिक स्तरावर नाव लौकीक मिळालेले उर्दु शायर बशर नवाज यांचे दु:खद निधन झाले त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.कैलास गायकवाड :मा.विरोधी पक्ष नेते यांचे बंधू अनवर खान,स.श्री.विकास एडके यांचे वडील प्रकाश एडके यांचे दु:खद निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे :यास माझे अनुमोदन आहे.

श्री.गजानन बारवाल :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :जगप्रसिध्द उर्दु शायर डॉ.बशर नवाज विरोधी पक्षनेता यांचे बंधु अनवर खॉन अब्बास खान व श्री. प्रकाश एडके यांचे निधन झाले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी उर्दु शायर बशर नवाज, प्रकाश एडके तसेच अनवर खान यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

**<u>विषय क्रमांक २०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहराचा विस्कळीत झालेला पाणी पुरवठा, पाणीपट्टी वसुली व नळांना बसविण्यात येत असलेले मिटर यावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**सुचक:-**श्री.थोरात दिलीप गंगाधर,श्री.गजानन रामकिसन बारवाल

**अनुमोदक:-**श्री.नितीन रमन चित्ते, श्रीमती कमल रामचंद्र नरोटे,

श्री.भगवान घडमोडे :स.सदस्यांच्या मागणी नुसार आजच्या विषयावर बैठक बोलवली त्याबद्दल आपले आभार मानतो. शहरातील पाणी स्थिती गंभीर होत आहे. प्रत्येक वेळेस कंपनीला सुचना दिल्या. अनेकदा बैठका घेतल्या परंतु सुधारणा झाली नाही. पाणी येण्याचे वेळापत्रक नाही केंव्हाही पाणी येते ३-४ दिवसानंतर पाणी येते घाण पाण्याच्या तक्रारी आहे. यामूळे अनेक आजाराने लोक त्रस्त असून ॲडमीट आहे.घाण पाणी येते त्या संदर्भातील कामे होत नाही जेथे काम करायचे तेथे ८-१५ दिवस कंपनी खड्डे खोदुन ठेवतात ही परिस्थिती सत्य की असत्य कंपनीला अधिकाऱ्यांना विचारणा करावी.

श्रीमती शेख समीना :माईक बंद आहे. चालू करावे.

मा.महापौर :ज्यांचेकडील माईक बंद आहे तेथे कॉडलेस दयावे. पुढील बैठकीपर्यंत माईकची व्यवस्था करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :पाणीप्रश्न जिव्हाळयाचा प्रश्न आहे. महिलांना अगोदर बोलण्याची संधी दयावी.

श्रीमती समीना शेख :७०% नवनिर्वाचीत सदस्य आहे.समांतर बरोबर झालेल्या करारनाम्याची प्रत मराठीतून करून देणार होते ती प्रत मिळाली नाही आम्ही चर्चा कशी करायची.

श्री.सिद्दीकी नासेर :करारनाम्याची प्रत दिली नाही कशावर चर्चा करायची?

श्री.जहागींर खान :पुर्ण सदस्यांना करारनाम्याची प्रत उर्दु,हिन्दी भाषेत ८ दिवसात प्रत दयावी.

मा.महापौर :प्रत सर्वांना मिळेल आजचा विषय विस्कळीत झालेला पाणीपुरवठा, वसुली,नळांना बसविण्यात येत असलेले मीटर यावर आहे.

श्री.सिद्दीकी नासेर :समांतर एक मोठा विषय आहे. पाणी विषय घेवून काय होणार आहे जी माहिती पाहिजे ती अनेकदा मागणी करूनही दिली नाही करारनाम्याची प्रत दिली नाही करारनामा काय झाला? ठराव काय झाले ? आम्हाला हे सर्व कसे कळणार?

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.गंगाधर ढगे :११३ सदस्य संख्या आहे. माईक सिस्टममध्ये सुधारणा का होत नाही माईक बंद आहे कसे बोलावे.

यावेळी डायस समोर अनेक सदस्य बसतात.

श्री.सिद्दीकी नासेर :माईक चालू करावे तोपर्यंत कामकाज होऊ नये.

श्री.जहागीर खान :माईक सिस्टम चालू करावी पाणीप्रश्न हा गंभीर विषय आहे सर्वांना बोलण्याची संधी दयावी.

श्रीमती खान सायरा बानो:महिलांना अगोदर बोलू दयावे माईक चालू करावे.

श्रीमती समीना शेख :करारनामा प्रत मिळाली नाही मराठी भाषेतून दयावी. केव्हा मिळेल?

मा.महापौर :दहा दिवसाच्या आत पुढील सभेपुर्वी करारनाम्याची प्रत सर्व सदस्यांना देण्यात येईल तसे संबधीत अधिकारी यांनी नियोजन करावे.

श्रीमती किर्ती शिंदे :करारनाम्यानुसार १३०० कि.मी च्या जलवाहिन्या व ३४ जलकुंभ हे काम ३ वर्षाच्या आत कंपनी करणार होते करार होऊन एक वर्ष झाले तर २००० मी.मी.व्यासाची जलवाहीनी मुख्य जलवाहिनी व अंतर्गत कामे दोन वर्षात पुर्ण होतील का? जलकुंभ बाधण्या बाबतचा तसेच १३०० कि.मी जलवाहिनी बाबतचा नियोजन आराखडा, नकाशा तयार केला का? त्याची माहिती सदस्यापर्यत यावी. अंतर्गत पाईप लाईनची कामे सुरू झाली त्यात अनेक समस्या निर्माण होत आहे, नागरीक व कंपनीसोबत नियमीत वाद होत आहे.

श्री.सिद्दीकी नासेर :१०-२० मिनिटात माईक व्यवस्थीत करावे तोपर्यत सभा तहकूब करावी.

मा.महापौर :सभा २० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते माईक सिस्टम चांगली करावी. (वेळ ११.०० वा.पुन्हा ११.२५ वा सभेला सुरूवात)

श्रीमती किर्ती शिंदे :नळांना मीटर हे नागरीकाच्या संमतीने बसवावे. वाद निर्माण होणार नाही कालच्या पेपरला बातमी की हवेचे पैसे कंपनी घेत आहे याबाबत खुलासा करावा. हवेवर न चालणारे असावे.

मा.महापौर :जे जे स.सदस्य आपआपल्या सुचना मांडतील त्या बाबत श्री.कोल्हे, कार्यकारी अभियंता यांनी नोंद घ्यावी.

श्री.नंदकुमार घोडेले :अनेक सदस्य नवीन आहेत हा प्रकल्प काय आहे? याबाबत पावर पॉईन्ट प्रेझेन्टेशननुसार सविस्तर माहिती सभागृहाला दाखविण्यात यावी. त्यानंतर चर्चा करावी.

श्री.भगवान घडमोडे :नियमीत पाणी सोडले जात नाही घाण पाणी येते ते दुर करण्याचे काम होत नाही कंपनी करीत असलेल्या कामावर प्रशासन समाधानी आहे का?

श्रीमती खान सायरा बानो:महिलांना बोलू दयावे कंपनीने आठ महिण्यात काय काम केले त्यांचेकडे लाईनमन नाही इंजिनिअर नाही महापालिकेने कर्मचारी दिले कंपनी काम करीत नाही. दोन दिवसा आड पाणी येत होते आता ९ दिवसानंतर पाणी येते जुन्या शहरात पाणी येत नाही महापालिकेने काम करावे निष्काम जन सेवा समर्पिता या प्रमाणे काम होत नाही. जुन्या शहरात लाईनचे कामे व्हावी कंपनीला समजावून सांगावे. आशिया खंडात या शहराचे नाव आहे. माईक सिस्टम खराब आहे आयुक्तांना माईक चेक करावे लागते अशी वेळ का आली. मागिल बॉडीच्या काळात जे झाले त्या संदर्भात आम्हास माहिती देण्यात यावी.

श्रीमती अर्चना निळकंठ :पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यत मीटर बसवू नये व पाणीपट्टी आकारू नये.

श्रीमती शोभा बुरांडे :माझ्या वार्डात १५ मिनिटे पाणी येते. घाण पाणी आले तर तेथे कोण्ी काम करणारे कामगार येत नाही.

श्रीमती समीना शेख :दोन महिण्यापासून सतत फोन लावून सुध्दा अधिकारी काम करीत नाही. लाईन बदलण्यासाठी पाईप नाही ड्रेनेजचे घाण पाणी पिण्याच्या पाण्यात मिक्स होऊन येते नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

श्रीमती मनिषा मुंढे :माझ्या वार्डात चार महिण्यापासून घाण पाणी येते फोन केला असता उचलत नाही. एका ठिकाणी मोठया प्रमाणात पाणी रस्त्यावर वाया जाते. फोन केला असता अधिकारी बरोबर बोलत नाही.

श्री.नाईकवाडी रहीम अब्दुल:माईक बंद आहे.सुधारणा केली नाही.

मा.महापौर :सर्वानी जागेवर बसावे एका वेळी एकच सदस्यांनी बोलावे सभागृहाचे पावित्र्य राखले पाहिजे अशा पध्दतीने बोलावे. एक एक सदस्यांनी बोलावे.

श्रीमती मनिषा मुंढे :४ थ्या दिवशी पाणी येणार असल्याचे सांगतात परंतु पाणी येत नाही. प्रत्यक्ष भेट दयावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :समांतरवर माहिती दयावी त्यांनतर सर्वांना बोलण्याची संधी दयावी.

श्रीमती ज्योती नाडे :माझ्या वार्डात दोन महिण्यापासून पाणी नाही. येणारे पाणी खराब येते सुरवातीला १५ मिनीटे हवा येते कंपनीचे लोक फोन उचलत नाही ३१.५.२०१५ रोजी पत्र दिले त्या संदर्भात कार्यवाही केली नाही. फोन बंद करून ठेवतात.

श्रीमती नसीब बी सांडू खॉ:वार्डात पाण्याची नवीन पाईप टाकावी, घाण पाणी येते.

श्रीमती सुरेखा सानप :वार्डात पाणी वेळेवर येत नाही व कमी प्रमाणात पाणी मिळते. नागरीकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो.

श्रीमती खान नसरीन बेगम:वार्डात खराब पाणी येते स्वच्छ पाणी मिळत नाही कोहीनूर कॉलनी बारापुल्ला गेट भागात पिण्याच्या पाण्याची गरज आहे.

श्रीमती सुरेखा सानप :ब्रीजवाडी भागात सुधारीत लोकसंख्या नुसार पाण्याची लाईन टाकण्याची गरज आहे मस्जीद रोड,ब्रीजवाडी,रोहीदास नगर भागात पाण्याची लाईन नाही या भागात २००० लोकसंख्या आहे. त्या पाईप लाईन केंव्हा टाकणार आहे.

श्रीमती किर्ती शिंदे :दोन वर्षात कंपनी कामे पुर्ण करणार की नाही.

श्रीमती सत्यभामा शिंदे :सिडको हडको भागात पाण्यासाठी नेहमीच नागरीकांना त्रास आहे. हा त्रास केंव्हा बंद होणार जलकुभांत पाणी पातळी येत नाही कारण काय पाणीपुरवठा सुरळीत होत नसतांना नळपट्टी वसुली होत आहे. होणारा पाणीपुरवठयाच्या तुलनेत सिडको हडकोची वसुली जास्त आहे जायकवाडी ते शहरापर्यतची संमातर वाहिनी लवकर टाकावी जनतेचा त्रास कमी करावा. याकडे गांभीर्याने पहावे.

श्रीमती सरवत बेगम :शहरातील नागरीकांना पाणी,स्वच्छता,लाईट तसेच आरोग्याच्या दृष्टीने सर्व सुविधा देणे मनपास बधंनकारक आहे. कंपनी काम करीत नाही करारनाम्याची प्रत सदस्यांना दिली नाही. समांतर एजन्सीला १.९.२०१४ रोजी पाणीपुरवठा योजना देऊन या कंपनीने नवीन पाईप लाईन टाकणे, मुख्य जलवाहिनी टाकणेचे व इतर सर्व पाणीपुरवठया संबधीचे कामे दिली ९ महिण्यात कंपनीने शहराचा पुर्ण पाणीपुरवठा विस्कळीत केला. शहागंज टाकीवरून १६ वार्डात पाणीपुरवठा होतो क्रांतीचौक टाकीवरून पाणी येते ६-७ दिवसाआड पाणी येते महिण्यातून ४ दिवस पाणी तर वर्षातून ४५ ते ४८ दिवस पाणी मिळते परंतु वसुली पुर्ण वर्षाची केली जाते.

श्रीमती अंकिता विधाते :वार्डात पाणी वेळेवर येत नाही.फोन केला तर उचलत नाही. अनेक लोक पाण्यासाठी ऑफिसला कंपनीला सुट्टी देऊन घरी बसतात. पाणी येण्याची वेळ निश्चित करावी. ६ वा.येणारे पाणी रात्री १०-११ वाजता येते.पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे घाण पाणी येते ४ थ्या दिवशी पाणी येऊन वेळेवर येत नाही. याची दखल घ्यावी

श्रीमती आशा निकाळजे :वार्ड क्र.१३ भिमनगर उत्तर भागात कमी तर काही भागात जास्त पाणी येते.

श्रीमती समीना शेख :पाणीपुरवठा जो पर्यत सुरळीत होत नाही तोपर्यत नळांना मीटर लावू नये.

श्रीमती खान सायरा बानो:१९७९ पासूनच्या लाईन शहागंज परीसरातील काही वार्डात आहे. त्या बदलण्याची गरज आहे. या लाईन केंव्हा बदलणार आहे खुलासा घ्यावा. शहागंजच्या टाकीवरून १६ वार्डात पाणीपुरवठा होतो तो अपुरा पडतो. जुन्या लाईन काढून नवीन लाईन टाकाव्या पुरेसे पाणी मिळेल यासाठी उपाययोजना करावी. रमजान महिना आहे वेळेवर पाणी सोडावे.

श्रीमती मिना गायके :पाण्याची टाकी जवळ असूनही मोठी पाईप लाईन असून पाणी येत नाही. या वार्डात हनुमाननगर,पुंडलिकनगरसह असे तीन वॉर्ड आहे. वेळेवर व पुरेसे पाणी सोडले जात नाही.

श्रीमती लता निकाळजे :वार्डात घाण पाणी येते. पिण्याचे पाणी वेळेवर येत नाही.नवीन वसाहत आहे. लाईन टाकावी.

श्रीमती ज्योती अभंग :माझ्या वार्डाची लोकसंख्या ११ हजार आहे या भागात पाईपलाईन नाही १० टँकर दररोज येतात तेवढे पाणी पुरत नाही. पाण्यासाठी येथे भांडणे होतात या वॉर्डाचे मोठे क्षेत्रफळ मोठे आहे. २०-२५ टँकर देण्यात यावे. जोपर्यत सुरळीत पाणीपुरवठा होत नाही तोपर्यत मीटर बसवू नये तसेच माझ्या वार्डात नवीन पाईप लाईन टाकण्यात यावी.

श्रीमती सिमा खरात :अधिकारी फोन उचलत नाही. नंतर आम्हाला फोन येतात की नागरीकांना सोबत आणू नका. आमचे कोणतेही काम होत नाही वार्डात वेळेवर पाणी येत नाही. कमी पाणी येते.पाणी येण्याचे वेळापत्रक करावे २० तारखेपर्यत पाणीपुरवठा सुरळीत करावा.

श्रीमती कमल नरोटे :सर्वांचाच पाण्याचा प्रश्न आहे मुकूंदवाडी भागात वेळेवर पाणी सोडण्यात यावे याबाबत नियोजन करावे. अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :सर्व माईक बंद देवून महिलाचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न पर्यायाने नागरीकांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न होत असेल तर हा गैरसमज आहे. ३६ माईक दुरूस्त होत नसेल तर विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत होईल का? हा प्रश्न पडतो. वार्डात गढूळ घाण पाणी येते याकडे लक्ष दिले जात नाही. मागिल बैठकीत या विषयावर चर्चा झाली होती. प्रश्न सुटला नाही.

श्री.राजू शिंदे :अधिकाऱ्यावर कार्यवाही केली तर पाणीपुरवठयाच्या समस्या मार्गी लागतील.

मा.आयुक्त :माईक बंद असल्याने दिलगिरी व्यक्त करतो पुढील सभेपर्यत दुरूस्त होतील. श्री.बनसोडे सेवानिवृत्त झाले त्यांचा चार्ज श्री.कोल्हे यांचेकडे दिलेला आहे ८-१० दिवसात माईक व्यवस्थीत केले जातील. काही माईक चालू आहे २० तारखेपुर्वी केले जाईल.

श्रीमती माधुरी देशमुख :जलकुभांवर फोन करून पाणी केंव्हा येईल विचारल्यास अधिकारी यांना विचारून सांगावे लागेल. अधिकारी यांना विचारले तर, जलकुभांवर विचारावे लागेल, अशी उत्तरे मिळतात. फोन कुणाला करायचा असा प्रश्न पडतो? नागरीक आम्हाला नगरसेवक कशाला झाले तुमचे ऐकत नाही तर आमचे कामे केंव्हा होणार, ही नगरसेवकांची चेष्टा चालली आहे. पाण्या विषयी जे प्रश्न सदस्यांचे असतील फोन केल्यास उचलले पाहिजे. पाणी येण्याची वेळ निश्चित असावी. नगर सेवकांना एस.एम.एस.करुन कळवावे.

श्रीमती वैशाली जाधव :माझ्या वार्डात हिनानगर,सावित्रीनगर भागात पाण्याची लाईन टाकावी तोपर्यत टँकरने पाणी पुरवठा करावा.

श्रीमती सरिता बोर्डे :प्रत्येकाच्या वार्डात पाण्या विषयी समस्या आहे.पाणी पुरवठा सुरळीत करून निश्चित वेळी सोडणे बाबत ठोस निर्णय घेवून कार्यवाही करावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:माझे वार्डात ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यात येते नागरीक आजारी पडण्याची शक्यता आहे कामे होत नाही नागरीक आम्हाला विचारणा करतात.

श्री.कैलास गायकवाड :समांतर कडे काम देऊन एक वर्ष झाले कामाला सुरूवात झाल्यानंतर सुधारणा झाली नाही,वार्डातील समस्या मांडण्यासाठी तक्रार देणेसाठी टोल फ्रि क्रमांक दिला त्यावर फोन केला तर पाण्याच्या संदर्भात दिलेल्या तक्रारीचे निरसण होत नाही. एक ते दीड महिना वेळ लागतो. एखादया ठिकाणी पाईप फुटली असेल,वॉल खराब असेल,त्याचे काम करायचे असेल तर फोन किंवा लेखी तक्रार विचारात घेतल्या जात नाही. अधिकाऱ्यांना सांगुनही निरसण होत नाही. इंदिरानगर दक्षिण येथील पाण्या संबधी तक्रार दिली होती कंपनीचे कुणीही अधिकारी तेथे आले नाही यात ३-४ महिण्याचा कालावधी गेला अशा पध्दतीने काम होत असेल तर नागरीकांना काय उत्तर देणार आहे तक्रार केल्यानंतर तीन दिवसाच्या आत किंवा लवकरात लवकर कसे काम होईल तसे आदेश समांतर एजन्सीला देण्यात यावे.

श्री.अफसर खान :विषेश सभा आयोजित केली पाणीप्रश्न तसेच घाण पाणी येते त्या सर्व प्रश्नावर चर्चा व्हावी. करारनामा केला त्यानुसार जर कंपनी २५ टक्के खर्च करणार असेल तर मनपाचे २५ टक्के खर्च व्हावे. कंपनीला आजपर्यत ६० कोटी दिले ५० टक्के मनपाचे यानुसार ३० कोटी मनपाचे होतात. ६० कोटी दिले तर १२० कोटीची कामे व्हायला पाहिजे वार्डात पाणी येत नाही घाण पाणी येते. मीटर आयएसआय मार्क कंपनीचे नाही. पैठण ते नक्षत्रवाडी पर्यत लाईन बसविल्या नंतर मीटर बसविणे व वसुली करणेचे काम कंपनीने करावे १२६०० रू एक मीटरसाठी मागणी होत आहे. नागीरक अशी रक्कम भरणार नाही आयएसआय मार्कचे पाईप टाकले जात नाही. नागरीकांवर बोजा टाकू नये कंपनीने ५ हप्यात वसुल करावे. एक वर्षात कंपनीने कोठे व कोणती कामे केली ६० कोटी दिलेले आहे का खुलासा घ्यावा.

श्री.गंगाधर ढगे :मीटर बसविले जात आहे ५-६ दिवसानंतर पाणी येते मीटर बसविण्याची घाई का होत आहे? नळाला २४ तास पाणी असावे त्यानंतर मीटर बसवावे. कंपनीने सिध्दार्थ उद्यान मध्ये मीटर बसविले रू.१२६६० मागणी केली ही रक्कम पाच हप्त्यात वसुल करणार असेल तर श्रीमती स्मिता के नागरे यांचेकडून कंपनीने मीटरचे १०२३९/- एकदम वसुल केले हा दुजाभाव कशासाठी खुलासा करावा.

श्री.नाईकवाडी अब्दुल रहिम:कंपनीने एक वर्षात काम केले नाही अनेक भागात महिण्यातून ४ दिवस पाणी येत आहे. तेही वेळेवर नाही. पाणी केंव्हा येणार विचारणा केल्यास टाकीची लेव्हल नाही,लाईट नव्हती पाईप फुटली होती. सदस्य पाण्यासाठी टाकीवर जातात त्याचेवर गुन्हे दाखल होते. वर्षातून ४८ दिवस पाणी दिले जाते तर वसुलीही त्या प्रमाणे करावी. नागरीकांना मुलभुत सुविधा देणे मनपाचे काम आहे. नेहरूनगर येथे पाण्याची टाकी आहे तीन वर्ष झाले,बंद आहे तेथून ६०-७० हजार नागरीकांना पाणीपुरवठा होऊ शकतो. अनेक ठिकाणी पाईप लाईनसाठी खडडे केले कामे होत नाही जुन्या शहरात कामे करण्यात यावी संमातर वर मनपाचे

कन्ट्रोल नाही जायकवाडी मधून येणारे लाईन लिकिजेस आहे त्यावर कंपनीचे लक्ष नाही. अनेक कारणे दाखवतात हे बरोबर नाही पाणीपुरवठा सुरळीत करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :३ महिन्यात ४-५ वेळेस या विषयावर बैठक झली आठ दिवसात पाणीपुरवठा सुरळीत होईल असे सांगण्यात आले. इतिहासात प्रथमच मा.पोलीस आयुक्त यांनी सुध्दा बैठक घेतली दुर्दैव तरी त्याचा कंपनीवर परीणाम नाही. तारीखवर तारीख त्याप्रमाणे बैठकी नंतर बैठक असा प्रकार होत आहे. जो निर्णय होईल त्याची अमलबजावणी व्हावी. सिडको हडको भागात महिण्यातून ४-५ दिवस पाणी येते टाक्या भरल्या जात नाही अशी उत्तरे मिळतात हे किती दिवस चालणार आहे खुलासा होत नाही. हर्सुल येथून तीन वार्डास पाणीपुरवठा होतो पाण्याची लाईन नसल्याने लोकांनी अनधिकृत नळ घेतले लाईन टाकावी नागरीक नळ घेण्यास व पैसे भरण्यास तयार आहे. करोडोचे काम कंपनी घेते १०० मी. पाईप टाकण्यास दोन वेळा काम केले. कंपनीकडे २००-२५० चे वॉल नाही. ही कंपनी समांतरचे काम करण्यास पात्र आहे का? जो निर्णय हाईल त्याची अंमलबजावणी व्हावी पाणी देत नाही मीटर लावण्याची सक्ती का होत आहे.

श्री.शेख जफर :वार्डात वर्षातून ५० दिवस पाणी येते त्यानुसार वसुली करणार की वर्षाची वसुली करणार समांतर एजन्सी गरीबांच्या नळांना मीटर बसवून लूट करीत आहे पाणी भरपूर नसतांना आम्ही मीटर बसवू देणार नाही.घाण पाणी येते तो प्रश्न कंपनीकडून सुटत नाही नाररीकांचे आरोग्य धोक्यात येण्याची वाट बघते काय. पाण्यासाठी नागरीक टाकीवर जातात कंपनीचे लोक दादागिरी करतात. २ मुलांवर केस केली. पाणी येण्याची वेळ निश्चित नाही पाण्यासाठी नागरीकांना दिवसभर ताटकळत बसावे लागते पाणीपुरवठा सुरळीत करावा वेळीच पाणी मिळावे. कधी रोजा इफतारच्या वेळी पाणी सोडतात.

श्री.चेतन कांबळे :आशिया खंडात या शहराचे नाव आहे. वार्ड क्र.१३ भीमनगर उत्त्तर मध्ये जेतवन व इतर सोसायटी मध्ये ८-१० वर्षापासून नागरीक पाणी विकत घेत आहे पाण्याची लाईन नाही. १-१ कि.मीटरवर नागरीक ड्रम उचलून घेवून जातात समांतरकडे काम दिले असतांना तेथे लाईनचे काम होत नाही तेथील नागरीक पैसे भरण्यास मीटर लावण्यास तयार आहे पाणी उपलब्ध करून दयावे.कंपनीकडे कर्मचारी किती ११३ वार्डात ते काम करू शकतात याची चौकशी करावी दारूच्या कंपनीना पाणी मिळते परंतु नागरीकांना नाही ही शोकांतिका आहे.

श्री.गजानन बारवाल :संमातर हा मोठा विषय आहे. शहरातील पाणीपुरवठा सर्व विस्कळीत झाला आहे. पैठण ते शहरापर्यत येणारे पाण्या मध्ये अडचणी आहे वार्डात ३-४-५ दिवसा आड पाणी येते.ज्यावेळी लाईट जाते पंपीग होण्यास वेळ लागतो अशा वेळी तेथे जनरेटर बसविण्याचे सुचविले होते.कार्यवाही केली नाही. शहरातील टाक्यामध्ये ५-६ मी.पर्यत लेव्हल

कधीच येत नाही पाणी येते त्यास प्रेशर नसते. १२२ एमएलडी पाणी येते मागणी १८० एमएलडीची आहे ५० एमएलडीचा फरक येतो.नाल्यामधून अनेक लाईन जातात त्यामूळे घाण पाणी येते कंपनी कोणतेही काम करीत नाही १ ते दीड महिणा कामासाठी लागतो अनेकांना वेळेवर पाणी मिळत नाही काही वार्डात ४-६-८ दिवसानंतर पाणी तर काही वार्डात ४-४ तास पाणी येते ही तफावत दुर करावी. कंपनीने विविध कारणे सांगून २७.५६ कोटीची मागणी केली. २७ कोटी मनपाचे घेवूने त्यावर मेन्टेनन्सचे काम चालू केले. महापालिकेला लुटण्यासाठी कंपनी आली लवकरच बंद पडेल असे वाटते. कंपनीला ३ वर्षाचा कालावधी दिला १ वर्ष कंपनीला काम देऊन होत आहे ३३ टक्के काम करणे आवश्यक होते ते केलेले दिसून येत नाही. मनपाच्या पैशावर कंपनीचे काम चालू आहे कंपनीला पेमेंन्ट दिले नाही तर १५टक्के व्याज दयावे लागते कंपनीने काम केले नाही तर काय कार्यवाही होणार हा सुध्दा अतिशय महत्वाचा विषय होतो. १२.६० कोटी लाईट बील भरावे लागते असे सांगण्यात येते ते प्रत्यक्षात दाखववे तसेच जलवाहिनीचे कामे कोठे सुरू केली किती ठिकाणी मिटर बसविले कंपनीला वसुली करण्याचे आदेशीत केले काय सर्व माहिती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य :आजची विशेष सभा या विषयावर आयोजित केली त्याबध्दल अभिनंदन करतो सर्व वार्डात पाणीपुरवठा विस्कळीत झाला माझ्या वार्डात राजनगर भागात २०० कुटूंब राहतात सर्व टॅक्स भरणारे नागरीक आहे येथे ३.३० वाजता पाणीपुरवठा होतो २ वाजेपासून महिला भगीनी जागी असतात. विस्कळीत पाणीपुरवठा कसा सुरळीत होईल. या बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. पैठण ते नक्षत्रवाडीपर्यत लाईन अगोदर टाकावी हे केले नाही आणि इन्टरनल लाईन टाकून उपयोजना होणार नाही. माझ्या वार्डात गुंठेवारी भाग आहे येथे अनेक वर्षापासून लाईन नाही. ५००-१००० फुटावरून नळाचे पाणी येते. हे लोक टॅक्स भरतात पाणीपट्टी भरतात परंतु अंतर्गत जलवाहिन्या येथे नाही. टाकीची किती लेव्हल आली तरी येथे प्रेशरने पाणी येणार नाही. गुंठेवारी भागात जलवाहिनी टाकाव्यात ५० टक्के नळ इलिगल आहे. रेग्यलूर करण्यास पैसे भरण्यास लोक तयार आहे. महापालिकेचे कंपनीने ऐकले नाही तर कार्यवाही सुरू करावी संमातर एजन्सीने निर्माण केलेले कॉन्ट्रक्टरचे कॉन्ट्रक्टर कोण आहे हे तपासण्याची गरज आहे. ११-१२ वी पास असलेले लोक काम करतात त्यांना बोलण्याची पध्दत माहित नाही. कमी शिकलेले लोक आहे नागरीकांशी कसे बोलावे याचे भान त्यांना नाही. कॉन्ट्रक्टरचे काम तपासण्यासाठी स्वतंत्र इजिनिअर नावाची कन्सेप्ट आहे. यात चार इजिनिअर आहे मागिल आठवडयात ते येऊन पाहणी केली या बारीक गोष्टीकडे लक्ष देण्याची जबाबदारी त्यांची आहे. करोडो पेमेन्ट त्यांना देणार आहोत कामाचा दर्जा,पाईप कोणते टाकले जात आहे कुठे कोणते पाईप टाकले पाहिजे या बाबत हायड्रॉलिक

मॉडल तयार करणार सांगण्यात आले त्याप्रमाणे पाईप टाकणार पहिल्या मजल्यापर्यंत पाणी मिळणार असे सांगण्यात आले होते. परंतु सदस्य मागणी करतात की पाईप चांगले टाकावे,काम लवकर व्हावे मागणी करतात. ज्या पध्दतीने काम व्हायला पाहिजे तसे होत नाही. तीन वर्षानंतर आज जी परीस्थिती तीच परीस्थिती निर्माण होईल कंपनीच्या लोकांना फोन केला असतांना फोन घेत नाही पाणी कधी येणार निश्चित सांगू शकत नाही. यामूळे नागरीक नाराज होत आहे. प्रत्येक वार्डासाठी कंपनीने एक जबाबदार व्यक्ती नियुक्त करावे जेणे करून तेथील सर्व समस्याचे उत्तर ते देतिल समांतर एजन्सीने पाणीपट्टी वसुली करू नये दिलेली बिले चुकीची आहे पाणीपुरवठा सुरळीत झाल्यानंतर मीटर लावावे. नो वाटर नो मिटर.

श्री.सय्यद मतीन :वार्ड २० मध्ये चार गल्ल्यात लाईन असून ६ महिण्यापासून पाणी येत नाही या संदर्भात पत्रही दिली फोन केला.कार्यवाही केली नाही.३ वाजता येणारे पाणी ऐन रोजा सोडतेवेळी आले.या वेळी पाणी येऊ नये. मीटर कोणत्या कंपनीचे बसवित आहे तसेच ६-६ तास नगरसेवकांना टाकीवर जाऊन बसावे लागते पाणी सोडण्याचे वेळापत्रक तयार करावे सर्वांना समान पाणी मिळावे. फोन केल्यास ते घेतले पाहिजे. आरेफ कॉलनी हिलाल कॉलनी भागात लाईन नाही टँकर दयावे ड्रेनेजचे घाण पाणी येत आहे मुस्लीम भागात हया समस्या जास्त आहे सर्वाना समान न्याय दयावा. अशी अपेक्षा आहे. पाण्याची वेळ निश्चित असावी. इफ्तारच्या वेळी सोडु नये.

श्री.नंदकुमार घोडेले :समांतर कडे पाणीपुरवठा दिला तेंव्हा पासून एकही दिवस सुरळीत पाणी पुरवठा झाला नाही कंपनीला महापालिकेचे वर्ग-१,२,३ चे तसेच लाईनमन दिले. कंपनीचे व मनपाचे अधिकारी यांचेत समन्वय झाला नसल्याने ही परीस्थिती निर्माण झाली असावी. नव्याने सदस्य निवडून आले ऐन उन्हाळयात त्रास सुरू झाला स.सदस्यांना टाकीवर जाऊन पाणी पुरवठा सुरळीत करावा अशी म्हणण्याची वेळ येते,दुर्दैवी बाब आहे. महापालिकेचे जसे प्रभाग निहाय पाणीपुरवठा अभियंता होते त्याप्रमाणे प्रभाग निहाय कार्यालय करून तेथे अधिकारी नेमावे व पाणीपुरवठयाच्या तक्रारी सोडवाव्या असे आदेशीत केले होते त्याची अमलबजावणी होत नाही. सहा महिने घाण पाण्याचा प्रश्न सुटत नसेल तर योग्य नाही माझ्या वार्डात एका ठिकाणी घाण पाण्याचा प्रश्न होता तेथील फॉल्ट सापडत नाही असे सांगण्यात येते हे बरोबर नाही. उत्सव,धार्मीक कामासाठी मंदीर,मस्जीद असेल येथे पाण्याची मागणी केल्यास टँकर मिळत नाही अशा वेळी टँकर दयावे सभागृहाचा निर्णय आहे अमलबजावणी कंपनी करीत नाही. टोल फ्रि क्रमांक दिला तो कुणी उचलत नाही. कर्मचारी जागेवर मिळत नाही. यासाठी अधिकारी कर्मचारी कंपनीचे लोक यांचा समन्वय आवश्यक आहे. पाणीपुरवठा विस्कळीत झाला तर महावितरणावर खापर फोडले जाते. विचारणा

केली तर दोष आमचा नाही कंपनीचा आहे असे सांगीतले जाते. करारनाम्यानुसार काम चालू आहे असे सांगितले जाते. सांगायचा मुळ उद्देश असा की वेळ पडली तर करारनाम्यात काही दुरूस्ती करायची गरज पडली तर तसा निर्णय सभागृहाने घ्यावा. तज्ञाचा सल्ला घेवून महापालिका जनतेच्या हिताचे असेल तसा करारनामा करावा. पैठण ते नक्षत्रवाडीपर्यतचे समांतरचे लाईनचे काम सुरू करण्याचे आदेशीत करावे तसेच शहरात जलवाहिन्या टाकल्यानंतर रस्त्याचे काम व्हावे सातारा देवळाई मनपात समाविष्ट होत आहे त्या भागातही समांतर एजन्सीला काम करण्याचे आदेशीत करावे. पाणीपुरवठा सुरळीत करावा.

श्री.राजू शिंदे :दोन प्रश्न आहे समांतर एजन्सीवर नियंत्रण कुणाचे आहे? खुलासा करावा.

मा.महापौर : सर्वांचे ऐकूण घेतल्यानंतर एकत्रित सर्व खुलासा होईल.

श्री.जहागीर खान : ज्यांनी सुचना मांडली त्याचा लगेच खुलासा व्हावा.

मा.महापौर :सर्वांनी बोलावे एकत्रित खुलासा घेतला जाईल.

श्री.राजू शिंदे :समांतरवर नियंत्रण कुणाचे आहे तसेच समांतर एजन्सीकडे पाणीपुरवठा हस्तांतर केल्यापासून पाण्याच्या टाक्या किती वेळेस स्वच्छ केलेल्या आहे. आज पाणी भरले तर दुसऱ्या दिवशी जंतू तयार होतात माझ्या माहिती प्रमाणे ८-१० महिण्यात पावडर वगैरे टाकून टाक्या स्वच्छ केल्या नाही त्यामूळे अनेक आजाराने थैमान घातले.स्थायी समितीला जेंव्हा विषय आला तेंव्हा २४ तास पाणी,१०० टक्के पाणी स्वच्छ पाणी कमी दराने पाणी मिळणार असे सांगण्यात आले होते. हायड्रोलीक सिस्टमचे निकष लावतात का त्यामूळे मंजूरी दिली परंतु समांतर आता व्यापार करीत आहे असे वाटते या सभागृहाचा योग्य निर्णय होतो तो जनतेपर्यंत गेला पाहिजे आताच म्हटले करारनामा दुरूस्ती करता येतो. त्या प्रमाणे कार्यवाही करावी. महापालिकेकडे पाणी होते तेंव्हा २ दिवसाआड पाणी देत होतो आता १० टक्के पाणी रिझर्व असून सुध्दा कंपनी ४ दिवसाआड पाणी देत आहे कंपनी कोणते पाईप टाकते तेथे जाऊन मनपाचे अधिकारी कुणीही बघत नाही कामात इन्व्हॉल होत नाही. महापालिकेचा यात सहभाग असेल तर समांतर लाईन सक्सेस होईल. वॉल, पाईप कंपनीकडे नाही काम चालू असते खड्डे करून ठेवतात वेळीच कामे होण्यासाठी मनपाचे अधिकारी व संमातरचे अधिकारी यांची एकत्रित बसून सर्व प्रश्न सोडवावे.जनतेला न्याय मिळेल असे कामे करावी. घाण पाणी येते त्याबध्दल माहिती दयावी.

श्री.जमीर कादरी जमीन की बात आसमान वाला नाराज है I १५ दिवस झाले मराठवाडयासह पावसाने हुलकावणी दिली अनेक भागात पाऊस नाही. आस्मान नाराज का तर कोठे तरी प्रॉब्लेम आहे. औरंगाबाद वॉटर युटीलिटी कंपनी आली तेंव्हा पासून पाण्याची समस्या सगळीकडे

वाढली. जो करारनामा केला किमान त्याची अमलबजावणी करावी. करार १००/-रू च्या बॉण्ड पेपरवर केला जेथे ६४ कोटी रूपये मुद्रांक शुल्क भरावे लागले असते हा मुददा समोर आलाच नाही. विस्कळीत झालेला पाणीपुरवठयावर योग्य तो मार्ग काढावा व नागरीकांना सुरळीत पुरेसा व वेळेवर पाणीपुरवठा कसा करता येईल लक्ष दयावे.

श्री.रेणुकादास वैद्य :५ लक्ष करारनामा साठी खर्च लागलेला आहे १००रू नाही.

श्री.शेख जफर :आमच्याकडे करारनाम्याची प्रत नाही पेपरच्या माध्यमातून आम्ही वाचतो.

श्री.सिद्यीकी नासेर :करारनाम्याची प्रत दयावी.

मा.महापौर :प्रत दिली जाईल प्रशासनाला आदेशीत केले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :इंटरनेटवर त्यांची प्रत उपलब्ध आहे.तेथून काढू शकतो.

श्री.सिद्दीकी नासेर :भारतात ईस्टइंडिया कंपनी आली होती. तसेच वाटर युटीलीटीचे दिसते. पाणीपुरवठा विस्कळीत झाला सत्य आहे कंपनीला काम दिले कंपनीपुढे प्रशासन हतबल आहे. पाणी केंव्हा येणार कुणी निश्चित सांगत नाही. करारनामा केला त्यानुसार कंपनी काम करीत नसेल तर या बाबतीत ठोस निर्णय होणे अपेक्षीत आहे. कंपनी त्यांचे मर्जीप्रमाणे काम करते कोटयावधीचे काम कंपनीला दिले पाण्या विषयी कोणतेही काम होत नाही ३०-४० मीटर पाईप कंपनीकडे नाही कंपनीच्या कामावर कुणाचे कन्ट्रोल नाही. घाण पाणी येते,पाणी मिळत नाही याबाबत नियोजन करावे.

श्री.नितीन चित्ते :आजची बैठक आयोजित केल्याबध्दल धन्यवाद, २ ते अडीच महिन्यापासून पाणी पुरवठा विस्कळीत आहे. सदस्यांनी चर्चा केली की, वार्डातील पाणी पुरवठा सुरळीत व्हावे. पाणी पुरवठा केंव्हा सुरळीत होणार निश्चित वेळ दयावी, पुन्हा या वर बैठक नको चर्चा नको, हायड्रोलिक सिस्टमने पाईप टाकले जाणार का हे स्पष्ट सांगावे.

श्री.अब्दुल नाविद :राहूलनगर, सादातनगर भागात पाणी येत नाही आले तरी घाण पाणी येते. निवडून आल्यापासून कंपनीकडे पाठपूरावा करीत आहे, कार्यवाही होत नाही. फोन केला तर उचलत नाही. वार्डात नवीन लाईन टाकणे आहे जी लाईन आहे तेथून घाण पाणी येते. वसुली मनपानेच करावी.

श्री शेख अब्दुल ताहेर :सभेचा विषय पाण्यावर चर्चा होते सदस्यांच्या भावना तिव्र असे वातावरण निर्माण झाले. विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत होण्यास किती वेळ लागणार आहे. जनतेला स्वच्छ पाणी भरपूर पाणी मिळाले पाहिजे शहरात १५ लक्ष लोकसंख्या आहे. ५लक्ष कनेक्शन असेल तेवढयाच समस्या आहे सुचना की सदस्यांच्या तक्रारीचे निराकरण कसे करता येईल ते पहावे. मनपाने यंत्रणा तयार करावी त्यात कनेक्टेव्हीटी असावी त्यात २-३ अधिकारी कर्मचारी असावे ज्या दिवशी ज्या भागात पाणी येते तेथे भेट दयावी. वार्डात अर्धा भागात पाणी येते तर अर्धा भागात पाणीच येत नाही ही सत्य परिस्थिती आहे.प्रतिनिधीने भेट दयावी. ४-८ दिवसात अशा समस्या सोडवाव्यात.

१५ दिवसाच्या आत हा सर्वे होईल.नागरीकांच्या घरापर्यत पाणी मिळेल अशी व्यवस्था करावी. गंभीर दखल घ्यावी.

मा.उपमहापौर :स.सदस्यांनी त्याचें वार्डातील समस्या मांडल्या परंतु ११३ वार्डातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. स्वतंत्र इजिनिअर नियुक्त केले जे मनपा व समांतर एजन्सी यामधील दुवा आहे. जो करारनामा केला त्याप्रमाणे काम करण्यास भाग पाडेल. या इंजिनिअरचे काम काय आहे. जेव्हा अधिकारी सांगतात कंपनी ऐकत नाही तर प्रकल्प संल्लागार यांनी काय काम केले आहे त्यांना पेमेंन्ट करतो एक वर्षात काय काम केले आहे. त्याचा अहवाल सभागृहासमोर दयावा.

श्री.राजगौरव वानखेडे :सर्वाच्या सुचनाचा खुलासा करावा.नाव घेऊन खुलासा करावा मोघम करू नये.

श्री.राहूल सोनवणे :नळ कनेक्शसाठी किती चार्ज आकारता येतो.

श्री.चेतन कांबळे :कंपनीचे एन-१ येथे ऑफिस आहे परंतु ऑफिसमध्ये नागरीकांना बसण्यासाठी व्यवस्था नाही. नागरीकांच्या तक्रारीचे तेथून निराकरण होत नाही. जास्तीत जास्त कार्यालय या कंपनीचे असावे जनतेला संपर्क करण्यास जवळ पडेल.

श्री.जहागीर खान : दिनांक २५.०६.२०१५ रोजी संमातर बरोबर झालेल्या करारनाम्याची तसेच नकाशाची प्रत मागितली, दिली नाही सर्वच पक्षाचे सदस्यांचे म्हणणे की वार्डात पाणीपुरवठा विस्कळीत झाला यापुर्वी दोन दिवसा आड नंतर ४ दिवसा आड आता ६ दिवसानंतर पाणी मिळणार असेल तर योग्य नाही. पाणी न देता मीटर बसविण्याची घाई का होते, ज्या भागात पाणी येत नाही तेथे टँकरने पाणी देण्याची करारानुसार अट आहे कंपनीचे लोक कुणाचे ऐकत नाही पाणीपुरवठा सुरळीत करावा त्यानंतर मीटर बसविण्याचा विचार करावा. वसुली करावी शहरात पाण्याच्या टाक्या कीती आहे त्या स्वच्छ होतात अंतर्गत जलवाहिनी किती टाकल्या कचरा उचलला जात नाही. या संदर्भात मा.पोलीस आयुक्तांना बैठक घ्यावी लागते ही अयोग्य बाब आहे नागरीकांना अगोदर सुविधा देण्यात याव्यात. जोपर्यंत पाणी नाही तो पर्यंत मिटर नाही. पाण्याची गरज १८० MLD त्या ऐवजी १२२ MLD पाणी देतात.

श्री.राजेंद्र जंजाळ :पाणी आले नाही तर लाईट नव्हती. महावितरणास दोषी धरले जाते. परंतु एक्सप्रेस लाईन टाकली आहे लाईट जात नाही. संमातरकडे अधिकारी कर्मचारी दिले. ते काम करण्यास तयार नाही. यावर मनपाचे कन्ट्रोल असावे. समन्वयाचा अभाव जाणवतो. शिवाजीनगरमध्ये २४ लक्ष लि.टाकी ती हस्तांतर केली. व तेथून पाणीपुरवठा करण्याच्या सुचना संमातरला दिल्या,शहरात ग्रॅव्हेटीने पाणी येते या टाकीतून ५ वार्डासाठी पाणीपुरवठा होऊ श्कातो. येणा-या काळात पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या सुचना देण्यात याव्यात. वार्डात पाणी केंव्हा येणार, पाणी सोडणारे कर्मचारी,जे.ई.उपअभियंता कोण त्यांचे मोबाईल नंबर दयावे, तक्रार कुणाकडे करायची याचा चार्ट तयार करून सदस्यांना दयावा.

पाणी येण्याची वेळ निश्चित करावी. समांतरचे व मनपाचे अधिकारी कर्मचारी यांचा समन्वय असावा व जोपर्यत पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यत मीटर बसवू नये.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी:आताच जेष्ठ सदस्यांनी म्हटले करारनामा रद्य करावा त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्रीमती माधुरी देशमुख :करेक्शन डीड सर्वांना विश्वासात, सभागृहाला विश्वासात घेवून करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :करारनामा रद्य करावा असे मी म्हटले नाही. करारनाम्यात काही दुरूस्ती करता येईल का सभागृहाचे मत घेवून पाहावे.

कार्य.अभियंता(पापू) :समांतर एजन्सीवर महापालिकेचे नियत्रंन आहे. मा.आयुक्त शहर अभियंता व संबधीत अधिकारी यांचे या कडे लक्ष आहे.

श्री.राजू शिंदे :सदस्यांनी फोन केल्यास अमुक अधिका-यांना फोन करा असे उत्त्तर मिळते. बाहेर एक व सभागृहात एक बोलतात हे बरोबर नाही. आताच स.सदस्य श्री. वैद्य यांनी म्हटले की फोन उचलत नाही.

कार्य.अभियंता(पापू) :विदयानगर मध्ये पाणीपुरवठा झाला नाही सदस्यांचा फोन आला त्यावर एजन्सीकडे आपले कर्मचारी आहे ते फोन उचलत नसेल तर उपअभियंता आहे. त्यांना फोन करू शकता असे म्हटले नंतर जेई ला फोन केला तर पाणीपुरवठा केलेला आहे असे म्हटले.

श्री.रेणुकादास वैद्य :श्री.कोल्हे यांचेकडे वर्कलोड आहे.त्यामुळे त्यांनी सांगितले की जे.ई किंवा उपअभियंता यांना बोललात तरी चालेल याचा अर्थ असाही होतो की मला अशा गोष्टी बोलण्याची गरज नाही जेई उपअभियंता असतील त्यांना बोला मी वाटर युटीलिटी कंपनीचे काम करतो. तुम्ही मला का विचारता.

कार्य.अभियंता (पापू) :मी असे बोललो नाही. असे असते तर मी जे.ई बोललो नसतो.

श्री.रेणुकादास वैद्य :अगोदर जेई उपअभियंता यांना फोन करतो त्यांनी उचलला नाही तर कार्य. अभियंता फोन करतो. परंतु जेई उपअभियंता आहे त्यांना फोन करा अशी बोलण्याची पध्दतबरोबर नाही.

श्री.भगवान घडमोडे :अधिकारी यांना फोन केल्यास कंपनीकडे मनपाचे अधिकारी कर्मचारी आहे अशी उत्तरे मिळतात.

श्री.राजू शिंदे :जेष्ठ सदस्यांना अशी उत्तरे देणे बरोबर नाही. सदस्यांनी कुणाकडे दाद मागायची. कंपनीकडील लोक रिस्पॉन्स देत नसतील तरच कार्य.अभियंता यांना फोन करतात.

मा.महापौर :या बाबत मा.आयुक्तांनी लक्ष घालावे समांतरचे कर्मचारी फोन उचलत नसतील तरच कार्य.अभियंता यांना सदस्य फोन करतात. सदस्यांचे म्हणणे अधिकारी यांनी ऐकूण घेवून प्रश्न सोडवावे.

श्री.भगवान घडमोडे :पाण्यासाठी सदस्यांना लाईनमनच्या मागे फिरावे लागते.ही पध्दत बंद करावी पाणीपुरवठा सुरळीत करावा.

मा.महापौर :वार्डातील समस्यासाठी फोन केल्यास काम होत नसेल तर मा.आयुक्तांनी संबधीतावर कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :१० ठिकाणी कॉल सेन्टर केले जाईल तेथे ज्या तक्रारी येतील त्यास रिस्पॉन्स दिला नाही तर मनपाचे असेल किंवा कंपनीचे कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित केली जाईल.

श्री.शिंदे राजू :महापालिकचे समांतरवर नियंत्रण आहे यानंतर सदस्य समांतर कडे फोन करणार नाही.

श्री.अब्दुल रहिम नाईकवाडी:कोणत्या वार्डात केंव्हा पाणी येणार वेळापत्रक तयार करावे प्रत आम्हाला दयावी.

श्री.भगवान घडमोडे :पाणी सोडण्याचे वेळापत्रक तयार करावे.सदस्यांचे फोन घेतले जावे तसेच घाण पाण्याची तक्रार किती दिवसात निकाली काढणार.

श्री.राजू शिंदे :पाणीपुरवठयाचे काम बाबत जबाबदारी फिक्स करावी.

कार्य.अभियंता (पापू) :घाण पाण्याची तक्रार असेल तरी कॉन्ट्रक्टरच्या मार्फत ते काम करून घेतले जाते.

श्री.राजगौरव वानखेडे :अनेक वॉल घाण पाण्यात आहेत.समांतरला फोन केल्यास उचलत नाही कंपनीचे कर्मचारी आरेरावीने बोलतात.त्यांना आता फोन करणार नाही उपआयुक्त दर्जाचे अधिकारी आहे त्यांचेकडे जबाबदारी फिक्स करावी.

श्री.घोडेले नंदकुमार :पाणीपुरवठया संबधी तक्रारीचा निपटारा करण्यासाठी कन्ट्रोल रूम असावे तेथे अधिकारी नियुक्त करावे.

मा.महापौर :सभा २.३० पर्यत तहकूब करण्यात येते.(वेळ १.५० पुन्हा ३.०० सभेला सुरूवात)

श्री.राजू शिंदे :१० सेन्टर निर्माण करणार तेथे कोणते अधिकारी दिले त्यांचे नाव व नंबर सदस्यांना दयावेत.जेणे करून कामे मार्गी लागतील.

श्री.नंदकुमार घोडेले :श्री.कोल्हे यांचे कडून सर्व प्रश्नाचा खुलासा घ्यावा.

श्री.राजू शिंदे :एकूण पाण्याच्या टाक्या किती कोणती टाकी केंव्हा साफ केली.

कार्य.अभियंता(पापू) :१ सप्टेंबर २०१४ पासून ४२ टाक्या धुतल्या ५९ टाक्या आहेत

श्री.राजू शिंदे :५९ टाक्या पैकी वर्षभरात ४२ टाक्या साफ सांगतात. स.श्री.विजय औताडे यांचे वार्डात असलेल्या टाकीमध्ये कबूतर पडले ते पाईप मध्ये अडकले. त्यांचे कडे व्हिडीओ चित्र आहे. नारेगाव वार्ड ३५ मधील टाकी केंव्हा साफ केली. तेथे पुरेसे पाणी नाही लोक आजारी पडतात. किती दिवसानंतर टाकी साफ केली पाहिजे.

कार्य.अभियंता(पापू) :कोणत्या टाक्या साफ केल्या त्याची यादी मागवावी लागेल.सहा महिण्यापर्यत एक वेळेस टाकी धुत होतो. जेथे पाणी नाही त्यास धुण्याची फारशी गरज वाटत नाही.

श्री.राजू शिंदे :ज्या टाक्या वापरात आहे कंपनीकडे देऊन १ वर्ष झाले सहा महिण्यातून एकदा टाकी धुत असेल तर वर्ष झाले दोन वेळेस साफ करणे आवश्यक होते ही दखल प्रशासनाने का घेतली नाही.

श्री.अब्दुल रहिमनाईकवाडी:एन-५ येथील टाकीचे ३ वर्षापासून छत पडले ते साफ केले नाही.

| | |
|---|---|
| श्री.राजू शिंदे | :टाक्या धुतल्या असेल तर स्वच्छ पाणी पुरवठा यायला पाहिजे. गढूळ घाण पाणी येत असल्याच्या अनेक तक्रारी आहे. जबाबदारी आपली आहे. |
| श्री.नितीन चित्ते | :एकही टाक्या धुतल्या नाहीत असे उत्तर देण्यात आले व ४२ टाक्या आता धुतल्या म्हणून सांगतात. |
| काय.अभियंता (पापू) | :कंपनीची जबाबदारी आहे. ४२ टाक्या धुतल्या ८-१० दिवसात सर्व टाक्या धुतल्या जातील. |
| मा.महापौर | :टाक्या धुतल्या बाबतची माहिती त्या वार्डातील सदस्यांना देण्यात यावी. |
| श्री.अफसर खान | :अधिकारी यांना काहीही माहिती नाही टाकीमध्ये घाण पडलेली आहे. अनेक टाक्यामध्ये कबूतर,झुरळे किडे मकुडे पडलेले आहेत. अधिकारी यांचे याकडे दुर्लक्ष आहे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :टाकी केंव्हा साफ केली किती कालावधीनंतर साफ होणार तसे बोर्ड प्रत्येक टाकीवर लावण्यात यावे. |
| श्री.राजू शिंदे | :पाण्याच्या टाकीवर वॉचमन नियुक्त करावे तेथील सुरक्षा होईल व पाणी आले की नाही ते कामे करतील. टाकीवर जाऊन मुले पाण्यात खेळतात यात अपघाती मृत्यू झाला तर मनपास नुकसान भरपाई दयावी लागेल. |
| श्री.नितीन चित्ते | :ज्या वार्डात टाक्या आहेत तेथील सदस्यांना टाकी धुतल्याची माहिती दयावी. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :पाण्याच्या टाकीवर ५-६ मुले खेळतात. त्याची चित्रफित माझ्याकडे आहे. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :एन-५ येथील टाकीचे छत पडले. ते साफ करण्याची जबाबदारी कुणाची आहे. |
| श्री.राजू शिंदे | :वॉचमन ठेवावे दोन फायदे सुरक्षा होईल व टाकीची लेव्हल आली की नाही ते पाहतील.माझ्या वार्डातील टाकी भरून वाहते नंतर कुणीतरी सांगतात तेंव्हा पुरवठा बंद होतो. |
| श्री.फिरोज खान | :शहागंज येथील टाकीवरून १६-१७ वार्डास पाणीपुरवठा होतो. तेथे ५० हजार लिटर संप तयार करावा. काम सुरू करावे. |
| श्री.नासेर सिद्दीकी | :मा.आयुक्ताच्या निवासस्थानाजवळील पंपीग खराब झाले नवीन पंप बसावे. आमच्या भागात योग्य दाबाने पाणी पुरवठा होत नाही. |
| श्री.जहागींर खान | :दिल्ली गेट येथील पंप खराब झालेला आहे कटकटगेटच्या भागात पाणी येत नाही. |
| मा.महापौर | :शहरातील सर्व टाक्या साफ कराव्यात. तेथे वॉचमन नेमावे समांतर कडे सोपविलेली सर्व कामे करून घ्यावीत. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :दुषित पाणी येते खुलासा करावा. |
| श्री.जमीर कादरी | :माझा वार्डाचा भाग उंचावर आहे तसेच वार्ड क्र.१९,२०,२१ हे देखील उंचावर दिल्लीगेट कडून पुरेसे पाणी येत नाही. टाकी बाधण्या बाबत ठराव झाला टाकीचे केंव्हा काम सुरू होणार आहे. तेथे टाकी बांधणे आवश्यक आहे. |

श्री.रेणुकादास वैद्य :माझ्या वार्डात एका सोसायटीच्या बाजूला टँकरपुरवठा सेंन्टर आहे बाजूच्या नागरीकांना त्रास होतो.या प्रकरणात कोर्ट मॅटर झाले. कार्टाने काही आदेश केले. कनिष्ठ अभियंतांना दाखवले कपाऊंड आवश्यक होते. कंपनीला हस्तांतर केले ते संरक्षीत भिंतीचे काम कोण करणार.

कार्य.अभियंता(पापू) :तेथील जागा कंपनीला हस्तांतर केली कंपनी काम करेल.

मा.महापौर :वॉटर युटीलिटी कंपनीला तसे पत्र देवून कपांऊड वॉलचे काम करून घ्यावे.

श्री.भगवान घडमोडे :माझ्या वार्डात १५ दिवसापासून दुषित पाणी येते ४ तारखेला पत्र दिले किती दिवसात काम करून दिले पाहिजे.सहा महिने झाले रस्त्यात खड्डा खोदून ठेवला.

कार्य.अभियंता(पापू) :तीन दिवसात काम केले पाहिजे.तेथील फॉल्ट सापडत नाही. कंपनीला पत्र पाठविले ,जाऊन तपासणी करायला पाहिजे.

मा.महापौर :दुषित पाणी येते त्याबध्दल किती दिवसाच्या आत काम होणार आहे.

मा.आयुक्त :ज्या तक्रारी येतील त्या तीन दिवसात सोडवल्या पाहिजे मोठया स्वरूपाचे काम असेल तर आठ दिवसात केले पाहिजे.काम वेळेवर न केल्यास नोटीस देऊन कंपनीवर कार्यवाही होईल.

श्री.भगवान घडमोडे :आतापर्यत कंपनीला किती नोटीस दिल्या.

श्री.नंदकुमार घोडेले :कुणाची तक्रार आली असेल तर २४ तासाच्या आत सोडवली पाहिजे कंपनीचे पैसे थकले तर व्याज मागतात कंपनीने काम न केल्यास करारनाम्यानुसार दंडात्मक कार्यवाही करावी सुट देऊ नये.

श्री.दिलीप थोरात :कंपनीवर दंडात्मक कार्यवाही आतापर्यत का केली नाही.

मा.महापौर :काम करण्यास उशीर केला तर कंपनीवर नोटीस देऊन कार्यवाही करावी. कंपनीला पाठीशी घालू नये.

श्री.प्रमोद राठोड :६ महिण्यापासून दुषित पाणी येते याच दरम्यान ४ बैठका झाल्या आजपर्यत कार्यवाही व ते काम का केले नाही.

कार्य.अभियंता(पापू) :कार्यवाही बाबत आता बैठक संपल्यानंतर पुन्हा कळविण्यात येईल.

श्री.रामेश्वर भादवे :कंपनीने खाजगी टँकर लावलेले आढळले. टँकरवर महानगरपालिकेचे नांव केले खाजगी ठिकाणी पाणी विकले तरी समजून येत नाही ज्या ठिकाणी पाणी येत नाही पाईप लाईन नाही अशा ठिकाणच्या तक्रारीचे २-३ दिवसात निरसण करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :२ दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर :वेळेवर पाणी न येणे, गढूळ पाणी येणे, पाईप लाईन न बदलणे वॉल चे काम न होणे या समस्या सर्वांच्या सारख्याच आहेत. समांतरच्या माध्यामातुन करुन घेणार.

श्री.अब्दुल रहिम नाइकवाडी:किती दिवसात शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करणार जायकवाडीमध्ये किती पाणी आहे.

कार्य.अभियंता(पापू) :सध्या जायकवाडीमध्ये ०-०५ इतका साठा आहे.

श्री.जहागींर खान :२००० अनधिकृत नळ कनेक्शनस आहेत. एका घरात ४-५ नळ कनेक्शनस आहेत. पाणी येत नाही ऐसी पाईप टाकले. डीआय पाईप टाकणार होते काम सुरू केले नाही नागरीकांचे नळ बंद केले.

श्री.राजकुमार वानखेडे :दुषित पाण्या संदर्भात केंव्हा कार्यवाही करणार आहे.

कार्य.अभियंता(पापू) :उदयाच या ठिकाणचे काम सुरू होईल.

श्रीमती अंकिता विधाते :दुषित पाणी येते पाईप लाईन केंव्हा बदलणार कंपनीचे लोकांना फॉल्ट सापडत नाही १५-१५ दिवस घाण पाणी येते नागरीक समस्या घेवून घरी येतात.

कार्य.अभियंता(पापू) :कंपनीला कळविण्यात येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :माझ्या वार्डात पाईप लाईनचे काम चालू आहे सध्या ते बंद आहे किती दिवसात होईल विचारले असता ३ वॉल बसवावे लागणार २५० चा वॉल आमच्याकडे नाही असे कंपनीचे लोक उत्तर देतात.

कार्य.अभियंता(पापू) :आठ दिवसात कार्यवाही केली जाईल.

श्री.जफर शेख :वार्ड ६० मध्ये दुषित पाणी येत असल्याचे कळविले कार्यवाही केली नाही वर्षातून ५० वेळा पाणी येते पाणीपट्टी त्या प्रमाणानुसार घेण्यात यावी.

श्री.जमीर कादरी :महिण्यातून ४ दिवस पाणी येते वर्षाला ४८-५० दिवस पाणी तर पाणीपट्टी किती वसुल करणार आहे.

मा.महापौर :जेथे घाण पाणी येते तेथील काम तातडीने करावे. पिण्याचे पाणी ५०-६० कि.मी पासून उचलून आणतो त्यावर जो खर्च येतो त्यानुसार पाणीपट्टीचे दर निश्चित केले जाते.

श्री.भगवान घडमोडे :४-५ दिवसानंतर पाणी येते असे असतांना मीटर बसविणे सयुक्तिक आहे का ? इन्डेपेन्डेन्ट इंजिनीअरचा रोल काय आहे.

मा.महापौर :या योजनेसाठी इन्डेपेन्डेन्ट इंजिनिअर आहे ते काय काम करतात. त्यांच्या कामाचे ऑडीट केले का माहिती दयावी.

कार्य.अभियंता(पापू) :जलवाहिनीच्या कामावर देखरेख व तांत्रिक सल्ला देणेसाठी सुचना हरकती कंपनीपर्यत पोहचविणे व काम करून घेणे काही अडचणी आल्यास गाईड करणे.

श्री.राजेंद्र जंजाळ :समांतरचे प्रकल्प सल्लागार यांचेसाठी स्वतंत्र अकाऊंट आहे. त्या खात्यावर पैसे जमा होतात पैसे देत असाल तर ते सेवा देणे, कामाचा दर्जा तसा ठेवतात का? जेथे काम चालू आहे तेथे प्रकल्प सल्लागार चे लोक येत नाही त्यांनी केलेल्या कामाचे ऑडीट करावे त्यानंतर पेमेंन्ट करावे.

यावेळी सभागृहात अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.नंदकुमार घोडेले :संमातर कडे वर्ग केलेला कर्मचारी यांचे वेतन कोण अदा करते.

कार्य.अभियंता(पापू) :M.J.P. चे सेवानिवृत्त यांचे कडे एकूण ८ कर्मचारी आहे. दोन कर्मचारी अभियंता आहेत.

मा.महापौर :एकूण पगार किती? स्टाफ किती? ते काय काम करतात?

कार्य.अभियंता(पापू) :या योजनेत तांत्रिक सल्लागार म्हणून पुणेची युनीटी कन्स्लटंट कंपनी आहे स्वतंत्र इंजिनिअर हे तांत्रिक सल्ला देणे, हायड्रोलिक मॉडल तयार करणे तांत्रिक कामे करणे,महापालिकेस सल्ला देणे कामावर देखरेख करणे ही कामे एजन्सी करते त्यांना योजनेच्या एकूण २.०५ टक्के इतकी रक्कम दिली जाते. ३ वर्षाच्या कालावधीत ५० टक्के कंपनी व ५० टक्के महापालिका रक्कम देईल.

श्री राजेंद्र जंजाळ :या एजन्सीने आजपर्यंत काय काम केले किती रक्कम देण्यात आली. क्रिशील एजन्सीने काय काम केले.

मा.उपमहापौर :गुणवत्तेबाबत कन्ट्रोल करावे असे म्हटले आतापर्यंत काय काम केले. किती रक्कम दिली. विस्कळीत पाणी पुरवठा कळविले का?

कार्य.अभियंता(पापू) :आतापर्यंत २.६० कोटी दिले

श्री.राजेंद्र जंजाळ :एवढी मोठी रक्कम दिली काम काय केले. रिपोर्ट दाखवा.

श्री.रेणुकादास वैद्य :या एजन्सीचे चार इंजिनिअर येतात परस्पर पाहणी करून जातात त्यांना काहीही माहिती नसते ५० हजाराचे काम होत नाही २-२ कोटी अशा प्रकारे वाटत असाल तर योग्य नाही ऑडीट झाल्याशिवाय पुढील पेमेंन्ट या एजन्सीला देऊ नये.

श्री.नंदकुमार घोडेले :या एजन्सीला पैसे देण्याचे तात्काळ थांबवावे काम किती होते ते बघून कार्यवाही करावी.

मा.महापौर :संबधीत एजन्सीने किती काम केले पैसे किती दिले किती दयायला पाहिजे होते सर्व ऑडीट करून त्याची प्रत स.पदाधिकारी यांना द्यावी. तोपर्यंत संबंधीत एजन्सीचे पेमेंट त्यांच्या अकाऊंटवर जमा करण्याचे थांबवावे.

श्रीमती खान सायरा बानो:२ दिवसानंतर ९-९ दिवसानंतर पाणी येते. ही समस्या केंव्हा मिटणार आहे.

मा.महापौर :शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे लाईन टाकणेची कामे, वेळेवर पाणी सोडणे, टाक्यावर वॉचमन देणे, दुर्गधीयुक्त पाणी येणे टाक्या स्वच्छ न होणे अशा समस्या आहे. ८-१० दिवसात ही सर्व कामे करावी संपुर्ण शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करावा.

श्री.भगवान घडमोडे :नळाला मुबलक पाणी नाही मिटरची सक्ती करतो. मीटर बसविण्याचे निकष काय माहिती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य :No water-No meter.

श्री.जहागींर खान :नळाला २४ तास पाणी दयावे त्यानंतर मीटर बसवावे. कमर्शियलला लावावे.

कार्य.अभियंता(पापू) :कंन्सेशन ॲग्रीमेंटच्या परिशिष्ट २४ प्रमाणे पहिल्या एक वर्षात १० टक्के मीटर बसवायचे त्यानुसार काम सुरू केले.

श्री.राजू शिंदे :पाणी वाढ नाही,सुधारणा झाली नसेल तर मीटर बसविणार का पहिले प्राधान्य कशाला देणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :लाईन टाकल्या नाही मीटर बसविणे योग्य वाटत नाही. सुरवातीला १५ मीनीटे हवा येते त्याचे पैसे घेणार काय ?

श्री.रेणुकादास वैद्य :कंपनीने नियोजन केले नाही कोठे ही जाऊन मीटर बसवितात पहिल्या वर्षी १० टक्के मीटर लावायचे तर कमर्शियल नळाला बसवावे तसे आदेशीत करावे.

श्री.राजू शिंदे :मीटर बसवले तेथे अगोदर हवा येते त्याची रिडींग पडते. येथे प्रत्यक्ष डेमो दाखवितो. जनतेला लुटणार असेल तर योग्य नाही २४ तास नळाला पाणी असावे तरच मीटर बसवावे.

यावेळी सभागृहातच नळाचे मीटर हवेने कसे फिरते त्याबाबत दाखवतात.

श्री.भगवान घडमोडे :मीटर लावणे सक्तीचे का? मीटर कोणत्या कंपनीचे ती कंपनी कोणाची आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :समांतर लाईन पुर्ण होत नाही तोपर्यंत मीटर बसविण्याला अर्थ नाही. कारारनाम्यानुसार मीटर बसविण्यासाठी अटी शर्ती दिल्या मनपाने आदेश केल्यानंतर त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. कंपनीकडून न घेता ग्राहकांना मीटर बसविण्याची मुभा दयावी व ते बसवितांना इजिनिअरींग कॉलेज कडून त्याची तपासणी करून घ्यावी.

श्री.भगवान घडमोडे :काही ठिकाणी मीटर बसविले क्वॉलीटी,ॲसेसरीज कशी हे बघीतले जात नाही मीटर बसवितांना स्टेनर, कन्ट्रोल लॉक, बॉक्स, वॉल पाहिजे,यासह ॲसेसरीज बसवून ३६००/-रू कॉस्ट होते परंतु ॲसेसरीज न बसवता ३६००/-रू.डीमांड नोटीस जाते मार्केट मध्ये ॲसेसरीजची किमंत ४६०रू मीटरची १००० आहे कंपनी जे मीटर बसवीत आहे. त्यात ॲसेसरीजची किमंत ५५० व मीटरची किमंत १२०० लावतात मार्केटच्या किमतीप्रमाणे मजुरीसह १५०० खर्च होतो परंतु कंपनी ३६००/-रू कशाच्या अधारे आकारत आहे. २४ तास पाणी असावे तेंव्हाच मीटर बसवावे. ते सुध्दा आयएसआय मार्कचे असावे.

श्री.राजू शिंदे :कनेक्शन धारकांना मीटर आणण्याची मुभा दयावी. बसवितांना तपासून घ्यावे. २४ तास ७ दिवस पाईपमध्ये पाणी राहील तरच मीटर लावतात.

यावेळी पाणी मुबलक दयावे नंतर मीटर अशा घोषणा स.सदस्य देतात.

श्री.राजेंद्र जंजाळ :जायकवाडी ते नक्षत्रवाडी लाईन टाकावी तोपर्यंत मीटर बसविण्यास स्थगिती दयावी.

श्री.दिलीप थोरात :जेथे मीटर बसविले त्यास मीटर रिडींग प्रमाणे बील आकारु नये. मिटर बसविण्या संबंधि मा.आयुतांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांचे निर्णयानुसार आपल्या देशामध्ये स्मार्ट सिटी, अटल मिशन,हाउसिंग फॉर ऑल या तीन योजना येणार आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :वाटर मीटर बसविले नाही तर या योजनेत शहराचा समावेश होऊ शकतो का?

मा.आयुक्त :स्मार्ट सिटी, अटल मिशन, हाउसिंग फॉर ऑल या तीन योजना जाहीर झाल्या. २ दिवस दिल्लीला १०० शहराचे महापौर, ५०० शहरांचे नगरपरिषदेचे नगराध्यक्ष तसेच सर्व राज्याचे नगरविकास मंत्री महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री व इतर राज्याचे मा.मुख्यमंत्री तेथे उपस्थित होते. मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी दोन दिवस या योजनेबद्दल महत्व

विषद केले. ५०-६० वर्षाचे व्हिजन काय पाहिजे शहरातील लोकसंख्या वाढते आहे. पुढेही वाढणार आहे यासाठी काय केले पाहिजे? सर्व माहिती दिली. स्मार्ट सिटीचा कन्सेप्ट ४ प्रकारे आहे. १.Retrofitting २. Redevelopment ३.Green Field ४.Pan City पहिले जे दिले त्यानुसार आहे तेथे त्याच सुविधा चालू ठेवणे, रि-डेव्हलपमेंन्ट शहराचा काही भाग पाडून टाकायचा नवीन प्लॅनींग करून विकास करायचा तीन नुसार शहराच्या बाजुला रिकामी जागा असेल तर तेथे नवीन शहर बसवायचे चार नुसार शहराच्या बाजूला नवीन शहर बसवितांना तेथे सर्व प्रकारचे स्मार्ट सोल्युशन पॉवर प्रमाणे सुविधा द्यायच्या हे करीत असतांना या तीनही योजनांना पहिली अट आहे. स्मार्ट सोल्युशन म्हणजे सर्व डाटा इंटरनेटचा वापर करून पाण्याचा, मालमत्तेचा सर्व डाटा ऑनलाईन करायचे जनतेच्या सर्व तक्रारी घेवून त्यांना ऑनलाईन उत्तर दयायचे. आजचा विषय मीटर बाबत आहे. त्यानुसार सांगतो की, मनपाचे, Local Body चे उत्पन्न वाढविण्यासाठी १०० टक्के मीटरींग व वसुली असली पाहिजे. ही अट टाकली आहे. मा.श्री.नायडू साहेबांनी सांगितले की हे करायचे नसेल तर जुन्याच योजनेनुसार काम करावे. नवीन योजनेत यायचे असेल व हे खर्चीक वाटत असेल तरी हे करावे लागेल. स्मार्ट मिटरींग मध्ये त्यांनी सांगीतले की, जेव्हा शहराला पाणीपुरवठा केला जातो यामध्ये नॉन रिव्हेन्यु नावाचा एक कन्सेप्ट असतो अशा प्रकारच्या पाण्यापासुन मनपास एक रुपयाचेही उत्पन्न मिळत नाही. ते कमी केले पाहिजे. शुन्यावर आणले पाहिजे प्रत्येक पाण्याचा थेंब मोजला गेला पाहिजे. पाणी वाया जाऊ नये त्यासाठी मीटरींग आवश्यक आहे. पुढील ५०-६० वर्षाचे व्हीजन ठेवून ही स्कीम राबवावी लागेल. यास मार्कस मिळवावे लागणार आहे त्याशिवाय ही योजना राबविता येणार नाही. आता नवीन निधी मिळविण्यासाठी सुध्दा हे करणे आवश्यक आहे पुर्वीचे युआयडीएसएसएमटी योजना होती वेगवेगळया योजना व कन्सेप्ट होते. ते आता तसेच ठेवले नाही. हया योजना राबवावयाच्या असतील याचे अधिकार त्यांना दिले ते शहरे निवडतील हे राबविले नाही तर राज्य व केंद्र शासनाकडून निधी मिळणार नाही. गटार योजनेत केंद्र शासनाचा निधी मंजूर होता आता तसे नाही मिशन मध्ये फॉर्म करायचे जे त्या योजनेमध्ये असतील त्यास निधी मिळेल सभागृहाला विनंती की, सेन्ट्रल गव्हर्नमेंटचा कन्सेप्ट बदलला आहे. यात फायदा करून घ्यायचे असेल तर ही योजना स्वीकारणे आवश्यक आहे यातून शहराला फायदा होणार आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :११४ शहरात गुंठेवारी भाग आहे तेथेही पाणीपुरवठयाची व्यवस्था करणार आहे का त्यास वेगळा निधी आहे का ?

मा.आयुक्त :स्मार्ट सिटी साठी आताच मी चार अंगे सांगितले ते कसे राबवावयाचे. आपण ठरावावयाचे शहराचा विकास करून त्या मध्ये ॲडजेस्ट करणे. म्हणजे टी पी विभागाचे डेव्हलपमेंन्ट रूल अंमलात आणून

रिॲडजेस्टमेंन्ट करणे, दुसरा रिडेव्हलपमेंन्ट जुन्या इमारती असतील तर त्या १०० टक्के पाडणे व तेथे नवीन प्लॅनींग करून विकास करणे तेथील दुकाने पाडून टाकणे तेथे टॉवर्स बांधणे त्या भागातील जे जे संबंधीत असेल त्या प्रत्येकास दुकान,घर देणे, ग्रीन सीटी म्हणजे शहराच्या बाजूला जेथे जमीन शिल्लक असतील तेथे विकास करणे व पॅन सिटी या ठिकाणी नव्याने शहर तयार करणे या सर्व गोष्टी १०० टक्के कराव्या लागतील यामध्ये सूट नाही.

श्री.प्रमोद राठोड :काही भागात मीटर बसविले सुरवातीला हवा येते हवेचे पैसे घेणार काय अगोदर मुबलक पाणी दयावे नंतर मीटरचा विचार करावा.

श्री.जहागींर खान :अगोदर २४ तास पाणी नळाला असावे त्यानंतर मीटर बसविण्याचा विचार करावा.

श्री.भगवान घडामोडे :आमच्या तक्रारीचे निरसण करावे मुबलक पाणी दयावे पाणीपुरवठयाची आवश्यक कामे सुरू करावे.

श्री.दिलीप थोरात :अमृत योजनेत मीटरींग बसविणे आवश्यक आहे ही अट आहे का ?

श्री.गजानन बारवाल :स्थायी समितीने २२-३-२०११ रोजी निर्णय घेतला की कंपनीने त्यांचे स्वखर्चाने मीटर बसवून पाच वर्षात काम पुर्ण करावे १५०० मीटरची कॉस्ट असतांना ३६२१/- कशाच्या अधारे घेत आहे.

श्री.राजू शिंदे :स्मार्ट सिटी संदर्भात कामे सुरू झाली का किती वेळ लागणार आहे.मध्ये कोणते उपक्रम राबविले पाहिजे ती कामे या शहरात पुर्ण होतील का? निकष काय आहे. २४ तास पाणी नळाला असावे १०० टक्के मीटर लावावे. नागरीकांचा स्मार्ट सिटीसाठी विरोध नाही.

श्री.जहागींर खान :स्मार्ट सिटी होईल, वेळ आहे अगोदर शहराला स्वच्छ पाणी दयावे नंतर मीटर बसवावे ते कंपनीने त्यांचे खर्चाने बसवावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :केंद्राची स्मार्ट सिटी अमृत योजनेत सहभाग होण्यासाठी लवकरच पाणीपुरवठयाचे नियोजन करून उपाययोजना कराव्यात मीटरसाठी ४ कंपन्या ऑथ्राईज करावे तेथून मीटर घेण्याची सक्ती करावी.

श्री.नितीन चित्ते :१० टक्के मीटर बसवावे परंतु मुबलक पाणी दयावे त्यानंतर कार्यवाही करावी तसेच एका ठराविक कंपनीचे मीटर घेण्याची सक्ती करू नये.नागरीकांना मुभा द्यावी.

श्री.राजू शिंदे :पाणीपट्टी वसुली मनपाने करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :थकबाकीची डिमांड नोंद मनपाकडे आहे मनपाने वसुली करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :कंपनीकडून होत असलेली वसुली थांबवावी सभागृहाने आदेशीत केले होते त्यांचे पालन होत नाही जे आदेश देणार त्याची अमलबजावणी होणार आहे का ?सभागृहाचा अवमान होता कामा नये.

मा.आयुक्त :पाणीपुरवठा योजना ही आउट डेटेड झाली मुदत संपली. १०० एमएलडी पाणी देऊ शकतो. नियमीत लाईन फुटते, मुदत संपली आहे. हे काम करण्यासाठी मनपाकडे पैसा नव्हता म्हणून समांतर योजना आपण सादर केली, पैसा नव्हता म्हणुन हा पर्याय आपण स्विकारला ही योजना सेंट्रल गव्हर्नमेंन्टने मंजुर केली त्यांचे रि-फॉर्मस् होते. त्यास

सभागृहाने मान्यता दिली. त्यानुसार काम चालू आहे. पहिल्या वर्षात १० टक्के दुसऱ्या वर्षात ४० टक्के व ३ वर्षात १०० टक्के अशा तीन टप्प्यात मीटर बसविणार आहे. पाण्याचा प्रश्न आहे. भावनात्मक इन्व्हॉल्व्हमेंट करु नये. एमएसईबी कडून अनेकदा लाईट जाते तेंव्हा जे रिडींग येते तेवढेच बील भरतो त्याप्रमाणे नळ मीटरचे असणार आहे.

श्री.भगवान घडमोडे :मुबलक पाणी दयावे त्यानंतर मीटर बसावावे.

श्री.राजू शिंदे :कंपनीने वसुली थांबवावी मा.पालक मंत्री यांनी आदेशीत केले त्याचे पालन होत नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :सभागृहास विनंती पाईप लाईन टाकावी नंतर मिटर बसविण्याचा विचार करावा. वसुली महानगपालिकेने करावी. रजिस्टर मेन्टेन करावे.

मा.आयुक्त :कमिशनर म्हणुन यास माझा विरोध आहे.

श्री.भगवान घडमोडे :प्रशासनाने दिशाभूल करू नये आमचा विरोध नाही अगोदर पाणी दयावे.

यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.राजेंद्र जंजाळ :करारनाम्यानुसार अमलबजावणी होते का? १० टक्के बसवायचेच असेल तर कमर्शियल नळाला बसवावे.

श्री.दिलीप थोरात :पाणी देणे बंधनकारक आहे. पाणी दिल्यावरच मिटर बसवावे.

श्री.शेख अब्दुल ताहेर :सेन्ट्रल गव्हरमेंन्टची ही योजना आहे इतका पैसे मनपाकडे नाही सेन्ट्रल गव्हरमेन्ट बरोबर ज्या प्रमाणे ठरले त्यानुसार सोबत राहून काम करावे लागेल नसता ही योजना बारगळून जाईल.योग्य निर्णय होऊन शहराला मुबलक पाणी कसे देता येईल ते बघावे.

मा.महापौर :या विषयावर बरीच चर्चा झाली. मा.आयुक्त यांनी सुध्दा त्यांची भुमिका मांडत असतांना शहराचा स्मार्ट सिटी मध्ये होत असलेला समावेश व त्या माध्यमातून होणारी कामे विकासा संदर्भात विषय मांडत असतांना सदस्यांच्या भावना रास्त होत्या. शहरातील विस्कळीत झालेला पाणीपुरवठा, पाणी पट्टी वसुली व नळाला बसविण्यात येणारे मिटर, कमी दाबाने पाणी येणे व पहिल्या वर्षी १० टक्के व दुस-या वर्षी ३५ टक्के व उर्वरित ३ या वर्षी मीटर बसविणे मा.आयुक्तांनी भुमिका मांडतांना पहिल्या वर्षी १० टक्के मीटर बसवावे अशा प्रशासनाच्या सुचना होत्या. त्याच प्रमाणे १०% प्रशासनाने मीटर बसवावे. परंतु ते मीटर कमर्शियल नळाला बसवावे. सदस्यांनी भावना व्यक्त केल्या त्यानुसार ते आयएसआय मार्कसचे असावे व बाहेरील ४-५ कंपनीकडून घेवू शकलो तर ती ग्राहाकांना मुभा राहिल. ती दिली पाहिजे. जोपर्यत पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यत वसुली बाबत सक्ती करू नये. मनपा ज्या प्रमाणे वसुलीचे काम करीत होते. त्याप्रमाणे ती करावी. स्मार्ट सिटी योजनेला कुणाचा विरोध नाही. शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करावा. पाणी पुरवठा सुरळीत करा, सुविधा द्या, परत १५ दिवसात मिटींग लावतो. सुचनाचा आदर व्हावा. पाणी पुरवठा सुरळीत

व्हावा. १५ दिवसात बैठक लावण्यात येईल. ज्या ज्या योजना असतील त्या पुढे नेण्यास सर्वांचे सहकार्य राहील.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराचा विस्कळीत झालेला पाणी पुरवठा, पाणीपट्टी वसुली व नळांना बसविण्यात येत असलेले मीटर या संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेनुसार खालील बाबींच्या संदर्भात कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झालेला असल्याने नवीन लाईन टाकणेची कामे, वेळेवर पाणी सोडणे,कमी दाबाने पाणी येणे, टाक्यावर वॉचमन देणे, दुर्गंधीयुक्त पाणी येणे, टाक्या स्वच्छ न होणे अशा समस्या सोडविण्यासाठी ८-१० दिवसात ही सर्व कामे करण्यात येऊन शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करावा.
२. प्रकल्प सल्लागार समिती (Independent Engineer) यांनी किती काम केले? पैसे किती दिले? किती दयायला पाहिजे होते? या बाबत सर्व तपासुन पुढील कार्यवाही करावी.
३. करारनाम्यानुसार पहिल्या वर्षी १० टक्के मीटर व्यावसायिक नळांना बसविण्यात यावे. मीटर आयएसआय मार्कसचे असावे व बाहेरील ४-५ कंपनीकडून वॉटर मीटर खरेदी करण्याची ग्राहकांना मुभा राहिल ती दिली पाहिजे.
४. जोपर्यत शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होत नाही. तोपर्यंत महानगरपालिका ज्या प्रमाणे वसुली करीत होते त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.